**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **नागनाथ त्र्यंबक कोडे,**
वयः– ६३ वर्षे, व्यवसायः– **सेवानिवृत्त**,
राहणारः– मुक्तेश्वर रोड**, औसा तालुका औसा जिल्हा लातूर.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकरी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. सन २०१५ पर्यंत मी औराद पोलिस स्टेशनमध्ये पो.हे.कॉ या पदावर काम करत होतो. दिनांक ३०/०३/२०१५ रोजी मी पोलिस स्टेशन मध्ये असताना गुप्त बातमीदामार्फत बातमी मिळाली की, दोन इसम मोटार सायकलवर चंदनाचे लाकूड घेवून जात आहेत. ती माहिती मी पी.एस.ओ. ला देवून मी, पोलिस कॉन्स्टेबल जोशी मोटारसायकलवरुन म्हसोबावाडी येथे १८.०० वाजता पोहोचलो. तेथे दोन पंचांना बोलावून त्यांना माहिती दिली. त्यावेळी औराद कडून निलंगा कडे जाणाऱ्या शाईन मोटारसायकलवरुन दोन इसम जाताना दिसले. त्यांच्याकडे पोत्याचे गाठोडे दिसले. त्यांना थांबवून त्याचे नाव–गाव विचारुन त्या गाठोड्यांची पंचांच्या समक्ष झडती घेतली असता त्यामध्ये ९ किलो चंदनांची लाकडे मिळून आले. त्या लाकडाचा पंचांच्या समक्ष पंचनामा करुन जप्त केला. पोलिस स्टेशनला नेवून गुन्हा रजिस्टर नंबर ३०२३/२०१५ नोंद केला. त्यानंतर त्या गुन्हयाचा चा तपास माझ्याकडे आला होता.

२. (आत्ता मला प्रस्तूत कामातील फिर्याद दाखवण्यात आली.) ती फिर्याद मी दिलेली असून त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.४६** देण्यात आली.

३. दि.३०.०३.२०१५ रोजी मी दोन पंचांच्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला होता. (आता मला प्रस्तुत कामातील दि.३०.०३.२०१५ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला) तो पंचनामा मी केलेला आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच दोन पंचांच्या सहया आहेत. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४७** देण्यात आली. सदर जप्ती पंचनामा करुन मी ९ किलो चंदणाचे लाकूड दोन पंचासमक्ष जप्त केले होते. ते लाकूड दाखवल्यास मी ओळखू शकतो. (आता मला प्रस्तुत कामातील एम. आर. नंबर ८३/२०२५ वरील जप्त ९ किलो चंदन लाकूड दाखवण्यात आले) ते चंदन मी आरोपी कडून जप्त केलेले चंदन आहे. जप्त चंदनापैकी एक लाकूड नमूना म्हणूण वन अधिकारी लातूर यांच्याकडे तपासणी करीता पाठवले होते.

३. मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले होते. आरोपीविरुध्द पुरावा तपासामध्ये मिळुन आल्याने त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. तपासामध्ये आरोपींनी प्रस्तुत गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले होते. आरोपींना मी ओळखतो. आरोपी क्र.१ व २ न्यायालयामध्ये हजर नाहीत. मी त्या सर्वांना ओळखतो.

**उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे अॅड.एच.व्ही. अलमले यांच्यामार्फेत शपथेवर सुरु–**

४. तथाकथीत आरोपींच्या कडील मोटारसायकल नंबर मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द मी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जप्ती पंचनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्त पंचनामा दोन पंचाच्या समक्ष केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दोषारोपपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. आरोपींच्या कडून मोटारसायकल जप्त केली असे साक्षीदार शिवाजी गाडगे यांनी तपासटीपण नोंदवतेवेळी सांगीतले नव्हते.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.12.04 16:48:42 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–०४/१२/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, निलंगा